आबासाहेब पाटील रेंदाळ सहकारी बँक लि., रेंदाळ
श्री विठ्ठल मंदीर देवालय ट्रस्ट, बिल्डींग मेन रोड,
मुख्य कार्यालय, रेंदाळ
ता. हातकणंगले, जिल्हा – कोल्हापूर

५७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा
नोटीस
(फक्त सभासदांचे करीता)

बँकेच्या सर्व भागधारक सभासदांना कळविणेत येते कि, बँकेची ५७ वी सन २०२०-२०२१ ची वार्षिक सर्वसाधारण सभा सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थिती शिवाय रविवार, दिनांक २९/०८/२०२१ इ. रोजी दुपारी 2.00 वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (V. C.) / अन्य ऑडिओ व्हिजुअल माध्यमाच्या (O A V M) द्वारे आयोजित करणेत आलेली आहे. सन्माननीय सभासदांना बँकेकडे नोंद केलेल्या इंटरनेट / व्हाटस्अँप असलेल्या मोबाईल क्रमांकाद्वारे बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभा कामकाजात लिंक द्वारे सहभागी होता येईल. सन्माननीय सभासदांना लिंकबाबत दिनांक २७/०८/२०२१ पर्यंत एसएमएस (SMS) द्वारे कळविणेत येईल तसेच सदर लिंकबाबत बँकेच्या संकेतस्थळावर (www.aprsbank.com ) सुध्दा माहिती प्रसिध्द करणेत येईल.

व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (V. C.) / अन्य ऑडिओ व्हिजुअल माध्यमाच्या (O A V M) द्वारे आयोजित करणेत आलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे विषय पुढीलप्रमाणे आहेत.

## सभेपुढील विषय

१. मागील दिनांक ०७/०३/२०२१ इ. रोजीचे वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे.
२. दिनांक ३१ मार्च २०२१ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा ताळेबंद व नफा-तोटा पत्रक वैधानिक लेखापरिक्षक यांनी तपासून प्रमाणित केले नुसार त्याची नोंद घेऊन ते स्वीकृत करणे.
३. मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या मार्च २०२१ अखेरील नफा विभागणीस मंजुरी देणे.
४. मा. संचालक मंडळाने सन २०२१-२०२२ सालाकरीता तयार केलेल्या अंदाजपत्रकास व सन २०२०-२०२१ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
५. मा. वैधानिक लेखापरीक्षक तसेच अंतर्गत लेखापरिक्षक यांचेकडुन प्राप्त झालेल्या सन २०२०-२०२१ च्या लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.
६. बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.-
७. सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षक नियुक्तीबाबत रिझर्व बँक ऑफ इंडिया यांचे निर्देशानुसार केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.
८. मा. संचालक मंडळाने सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षासाठी अंतर्गत तपासणीसाठी (इंटर्नल ऑडिटर) प्रभावी होणेसाठी प्राप्त अर्जामधुन सच्चिदानंद अॅन्ड कंपनी प्रोप्रा सच्चिदानंद कुलकर्णी , संदीप संकपाळ अँड कंपनी प्रोप्रा श्री संदीप संकपाळ व बसुदे मकोटे अँड सैनी प्रोप्रा सागर जगन्नाथ मकोटे यांची अंतर्गत तपासणी (इंटर्नल ऑडिट) साठी कामाची विभागणी करुन केलेल्या नियुक्तीस व ठरविलेला मेहनतान्यास कार्योत्तर मंजुरी देणे.
९. मा. वैधानिक लेखापरिक्षक यांनी प्रमाणित केलेनुसार सहकार खाते महाराष्ट्र शासन, यांचे नागरी सहकारी बँकांना लागू केलेल्या एकरकमी कर्ज परतफेड योजनेअंतर्गत सहभाग घेतलेल्या व त्यानुसार कर्ज परकफेड केलेल्या कर्जदारांची नोंद घेऊन त्यास मंजुरी देणे.
१०. सन २०२०-२०२१ मध्ये कर्ज हप्त्याची नियमितपणे परतफेड करणाऱ्या सभासदांना मा. संचालक मंडळ सभेने मंजूर केलेल्या कर्जावरील व्याजातील रिबेट ला कार्योत्तर मंजुरी देणे.
११. मा. अध्यक्षसो यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

येणेप्रमाणे असे दिनांक ०७/०८/२०२१
स्थळ - रेंदाळ

संचालक मंडळाचे आदेशानुसार
श्री सूर्यकांत शंकरराव जाधव
मुख्य कार्यकारी अधिकारी

सूचना –

१) सभासदांनी आपला इंटरनेट / व्हाट्सअप असलेला मोबाईल क्रमांक बँकेच्या मुख्य कार्यालयाकडील बोर्ड विभाग अधिकारी श्री आनंदा गुंडाप्पा कोळी यांचा मोबाईल क्रं. ९६५७६५२९०१ वर किंवा बँकेच्या मुख्य कार्यालयाकडील दुरध्वनी क्रमांक ०२३०-२४५०१२३ वर कार्यालयीन कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेत जास्तीत जास्त दिनांक २०/०८/२०२१ संपर्क करुन कळविणेचा आहे.

२) सभेच्या कामकाजात सहभागी होण्यासाठी सभासदांनी त्यांना त्यांचे मोबाईल क्रमांकावर पाठविलेल्या स्वतंत्र लिंकला लॉग-ईन (Login) करुन सभेस सहभागी होणेचा आहे. सभासदाने लिंकला यशस्वीपणे लॉग-ईन (Login) केले नंतरच त्याची सभेसाठीची उपस्थिती ग्राह्य धरली जाईल.

३) सन्माननीय सभासदांनी सभेपुढे ठेवावयाच्या आपल्या लेखी सूचना बँकेच्या मुख्य कार्यालयाकडे वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी किमान आठ दिवस अगोदर पाठवाव्यात. पाठविलेल्या प्रश्नाचे उत्तर संबंधित सभासदास व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (V. C.) / अन्य ऑडिओ व्हिजुअल माध्यमाच्या (O A V M) द्वारे होणाऱ्या वार्षिक सभेत तो लिंक असलेस दिले जाईल.

४) पोटनियमानुसार बँकेच्या भागाची दर्शनी किंमत रु. १०००/-- असून ज्या सभासदांची भागधारणा त्यापेक्षा कमी आहे त्यांनी अपूर्ण भागभांडवलाची रक्कम लवकरात लवकर भरुन सहकार्य करावे तसेच ज्या सभासदांनी अद्यापही रु. १०००/- चे पटीत भागधारणा केलेली नाही त्यांनीसुध्दा अपूर्ण भागभांडवलाची रक्कम लवकरात लवकर भरुन सहकार्य करावे.

५) दिनांक ०१/०४/२०१९ ते दिनांक ३१/०७/२०२१ अखेर पैसे भरणे अथवा काढणे असे स्वत:हुन करावयाचे व्यवहार केलेले नाहीत, अशा सभासद खातेदारांनी त्यांचे खात्यावर तात्काळ व्यवहार करावेत.

६) ज्या नियमित सभासद खातेदारांनी सी-केवायसी (C-KYC) बाबतचे कागदपत्रांची अद्याप पूर्तता केलली नाही त्यांनी आपला ग्राहक ओळखा निकष (KYC Norms) नुसार ची कागदपत्रे दिनांक ३१/०८/२०२१ पर्यंत बँकेच्या संबंधित शाखेकडे सादर करावीत.

७) पोटनियमानुसार प्रत्येक सभासदांने क्रियाशील सभासद होणेसाठी पाच वर्षातून किमान एकदा वार्षिक सभेस उपस्थित राहणे आवश्यक आहे.

८) सन २०२०-२०२१ चा वार्षिक अहवाल नजीकच्या शाखेत तसेच बँकेच्या www.aprsbank.com या वेबसाईटवर उपलब्ध आहे. तसेच सर्व शाखांच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत आलेला आहे.